दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ४३ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.७ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# निकषातील लाडक्या बहिणींनाच मिळतील २१०० रु.– फडणवीस

## आधी आर्थिक स्त्रोताची व्यवस्था करून रक्कम वाढवण्याचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेताच देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजनेविषयी महत्त्वाची घोषणा केली. महायुतीच्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याचे आश्वासन नमूद होते. त्याविषयी मंत्रालय पत्रकार संघाच्या पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, निकषात बसणाऱ्यांनाच २१०० रुपये मिळतील. ही वाढीव रक्कम नेमकी कधीपासून महिलांच्या खात्यात जमा होईल, या प्रश्नावर त्यांनी 'आधी आर्थिक स्त्रोताची व्यवस्था करून रक्कम वाढवू' असा दावा केला.फडणवीसांनी सांगितले की, शेतकरी सन्मान योजना जेव्हा सुरू केली तेव्हा अनेक सधन शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला होता. मात्र, सरकारच्या आवाहनानंतर सधन शेतकऱ्यांनी तो लाभ सोडला होता. मग ही योजना स्थिर झाली. त्याप्रमाणेच लाडकी बहीण योजनाही स्थिर होईल. मात्र, या योजनेत काही लाडक्या बहिणी निकषाच्या बाहेर असतील त्यावर विचार करू.**



### मी डीसीएम म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन : शिंदे

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही पत्रकार परिषद घेऊन मोदी, शाहांचे आभार मानले. ते म्हणाले की, मी सीएम असताना स्वत:ला कॉमन मॅन समजत होतो. आता मी डीसीएम म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन झालो आहे. सामान्य माणसाच्या सेवेसाठी समर्पित झाला आहे. मला सीएम असताना फडणवीसांनी जसे सहकार्य केले तसेच मी त्यांना करणार करणार आहे, असा दावाही शिंदेंनी केला.**

विरोधकांकडे नियमानुसार अपेक्षित संख्याबळ नसले तरी मविआतर्फे विरोधी पक्षनेतेपदावर दावा केला जाणार आहे, असे निदर्शनास आणून दिले असता फडणवीस म्हणाले की, विरोधी पक्षनेता निवडीचा अधिकार सभागृहाच्या अध्यक्षांचा असतो. तो सरकारचा निर्णय नसतो. त्यामुळे अध्यक्ष जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य राहील. लोकसभेतही १० वर्षे विरोधी पक्षनेतेपद नव्हते तरीदेखील जो सर्वात मोठ्या पक्षाचा नेता होता त्याला लोकसभेने विरोधी पक्षनेत्याप्रमाणे सगळे अधिकार दिले होते. त्याचप्रमाणे विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घेतला तर तोही मान्य असेल.या योजनांवर भर देऊ : १. पायाभूत सुविधा, २. १६ हजार मेगावॅटची सौरऊर्जा निर्मिती, ३. नदीजोड प्रकल्प, ४. जलयुक्त शिवार या योजनांवर भर देऊन मुलींना १०० टक्के शैक्षणिक शुल्क देण्याचा प्रयत्न असेल. निवडणुकीच्या पूर्वी महायुतीने दिलेल्या वचननाम्यातील सर्व आश्वासने आम्ही पूर्ण करू, असेही फडणवीस यांनी सांगितले.नागपूर ते गोवा शक्तिपीठ मार्गाला सांगली जिल्ह्यापर्यंत समर्थन, तर कोल्हापूर जिल्ह्यात विरोध आहे. शेतकऱ्यांचा विरोध पत्करून आणि त्यांच्या जमिनी घेऊन विकास करण्याची मानसिकता आमची नाही. त्यामुळे चर्चेतून मार्ग काढू. समृद्धीमुळे जसे मराठवाड्यातील चित्र बदलले तसेच शक्तिपीठमुळे अनेक भागांचे चित्र बदलेल, असे सांगत फडणवीस म्हणाले की, शक्ती कायद्यातील काही तरतुदींसंदर्भात सुप्रीम कोर्टाने काही विसंगत निर्णय दिले. यानंतर केंद्र सरकारने तीन कायदे आणले. त्यात आपले कायदे विसंगत होताहेत. त्यामुळे केंद्र सरकारशी बोलणी करू.

---

# विषबाधा प्रकरणात सखोल चौकशी करावी–आ.मुनगंटीवार

## विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना तातडीने वैद्यकीय सुविधा द्या

**मुल | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या विषबाधा प्रकरणातील सखोल चौकशी करण्याचे स्पष्ट निर्देश आ. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिले आहेत. सावली तालुक्यातील पारडी येथील जिल्हा परिषद शाळेत खिचडीतून विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध करून द्यावे, अशाही सूचना आ. मुनगंटीवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



सावली तालुक्यातील पारडी येथील जिल्हा परीषद शाळेत विद्यार्थ्यांना खिचडीतून विषबाधा झाली. या शाळेत एकूण १२६ विद्यार्थ्यांना खिचडी देण्यात आली. या विद्यार्थ्यांनी खिचडी खाल्ल्यानंतर त्यातील १०६ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली त्यामुळे विद्यार्थ्यांना उपचारासाठी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना खिचडीतून विषबाधा झाल्याची माहिती मिळत आहे. या संपुर्ण प्रकरणाची नि:पक्ष चौकशी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आ. मुनगंटीवार यांनी दिले आहेत. रुग्णालयात भरती विद्यार्थांना उत्तम उपचार मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष द्यावे, असे निर्देशही आ. मुनगंटीवार यांनी दिले आहेत.

---

### महाड ते बदामी आणि हम्पी सायकल प्रवास

# डॉ.संजय मपारा आणि गिरीश हडप यांचा ६०० किलोमीटरचा प्रवास

**महाड | प्रतिनिधी**

महाड येथील डॉ. संजय मपारा (वय ६९) व गिरीश हडप (वय ३९) यांनी ५ डिसेंबर २०२४ रोजी महाड ते बदामी आणि हम्पी यामध्ये ६०० किलोमीटरचा सायकल प्रवास सहा दिवसांत यशस्वीरित्या पूर्ण केला. या कार्यामुळे महाडच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. ६९ वर्षीय डॉ. संजय मपारा यांच्या इच्छाशक्तीचे प्रदर्शन महाडकरांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांना साथ देणारे गिरीश हडप हे महाड औद्योगिक वसाहतीतील डिफ्लॉन कंपनीत कर्मचारी आहेत.

या दोघांनी २९ नोव्हेंबर २०२४ रोजी या प्रवासाची सुरूवात केली होती. त्यांचा मार्ग पुढीलप्रमाणे होता: महाड ते महाबळेश्वर (५९ किलोमीटर), महाबळेश्वर ते सातारा, रहमतपूर, विटा (१३० किलोमीटर), विटा ते तासगाव, मिरज, तेरडल (११५ किलोमीटर), तेरडल ते महालिंगपूर, मुधोळ, बदामी (११५ किलोमीटर), बदामी ते पट्टणकल्लू, इलकल (५९ किलोमीटर), आणि इलकल ते होस्पेट, हम्पी (१०२ किलोमीटर). हा सर्व प्रवास त्यांनी सकाळी यशस्वीरित्या पूर्ण केला.

आज, हम्पी शहरामध्ये फेरफटका घेतल्यानंतर, ते पुणे मार्गे रेल्वेने महाडला परत येणार असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांकडून सांगण्यात आले. याआधी २०२३ मध्ये त्यांनी अलिबाग आणि २०२२ मध्ये गोव्यात सायकल प्रवास केला होता. महाडच्या बालरोग तज्ञ म्हणून प्रसिद्ध असलेले डॉ. संजय मपारा यांचे सायकल प्रेम सर्वश्रुत आहे. त्यांना त्यांच्यापेक्षा तरुण असलेल्या गिरीश हडप याने सहकार्य दिले. ७० व्या वर्षी ही इच्छा शक्ती आणि धैर्य दाखवणाऱ्या डॉ. मपारा यांचे उदाहरण आजच्या तरुणांसाठी एक प्रेरणा आहे. त्यांच्या या साहसी मोहिमेवर ज्येष्ठ नागरिक तसेच सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदन होत आहे. तरुण पिढीने या दोन महाडकर नागरिकांकडून प्रेरणा घेऊन अशा साहसी मोहिमांमध्ये सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# फडणवीसांना मुख्यमंत्रीपदासाठी शुभेच्छा आता लाडक्या बहिणींसाठी नाही,तर सगळ्या घटकांसाठी काम करावे–इम्तियाज जलील

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी फडणवीसांना शुभेच्छा दिल्या आहेत. मी देवेंद्र फडणवीसांचे अभिनंदन करतो, आता त्यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी काम करावे, असे इम्तियाज जलील म्हणाले. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे १३२ आमदार निवडून आले आहेत, ते कसे आलेत हे सगळ्यांना माहित आहे, असे म्हणत टोलाही लगावला.

महाराष्ट्राचे २१ मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांचा शपथविधी होणार आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार देखील उपमुख्यमंत्रिपदाची शपथ ग्रहण करणार आहेत. यासाठी अनेक नेत्यांकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आहेत. इम्तियाज जलील यांनी देवेंद्र फडणवीसांना शपथविधीसाठी शुभेच्छा दिल्या.


देवेंद्र फडणवीसांनी आता फक्त लाडक्या बहिणींसाठी नाही, तर लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके बेरोजगार या सगळ्यांसाठी काम करावे, असा चिमटा इम्तियाज जलील यांनी काढला. महाराष्ट्रात महायुती बहुमताने जिंकली. एकट्या भाजपने फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली १३२ आमदार निवडून आणले, ते कसे आले हे वेगळे सांगण्याची गरज नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. देवेंद्र फडणवीसांनी महाराष्ट्राच्या हितासाठी काम करावे. बेरोजगार तरुणांच्या हाताला काम द्यावे तसेच शेतकऱ्यांच्या मलाला भाव द्यावा, एवढीच अपेक्षा त्यांच्याकडून



असल्याचे इम्तियाज जलील म्हणाले.

इम्तियाज जलील यांचा विधानसभा निवडणुकीत औरंगाबाद पूर्व मतदारसंघातून पराभव झाला. भाजपचे अतुल सावे यांनी २१०० मतांनी जलील यांना पराभूत केले. मतदानाच्यावेळी भाजपचे उमेदवार मंत्री अतुल सावे यांनी पैसे वाटप केले, असा आरोप इम्तियाज जलील यांनी केला होता. यासंदर्भातील व्हिडिओ आणि इतर पुरावे देखील इम्तियाज जलील यांनी निवडणूक आयोगाकडे पाठवले होते. जिल्हाधिकारी, निवडणुक निर्णय अधिकारी, पोलिस आयुक्त यांच्याकडे लेखी तक्रार देऊन चौकशीची मागणी केली होती. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यांची समिती नेमली होती.या समितीने अतुल सावे यांना क्लिनचीट दिली. अतुल सावे यांनी पैसे वाटल्याचे सिद्ध झाले नसल्याचे समितीने अहवालात म्हटले. या जलील यांनी संताप व्यक्त केला आहे. हे प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत घेऊन जाणार असल्याचे इम्तियाज जलील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

---




---

# अनोळखी मृत्यकाची ओळख पटविण्याकरीता संपर्क करण्याचे आवाहन

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

वरोरा रेल्वे स्टेशन येथे दक्षिण एक्सप्रेस मधून एका अनोळखी पुरुषाला खाली उतरवून सरकारी दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले, असे बल्लारशहा ड्यूटी रेल्वे स्टेशन उपप्रबंधक यांनी लेखी मेमोद्वारे पोलिसांना कळविले. त्यानुसार अकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली असून सदर इसम बेवारस असल्याने अनोळखी पुरुषाची आजपावेतो ओळख पटलेली नसून नाव, पत्ता किंवा नातेवाईकाबाबत माहिती मिळालेली नाही.

मृतकाचे वर्णन : अनोळखी पुरुष, रंग –सावळा, बांधा – सडपातळ , उंची – ५ फुट २ इंच, केस – काळे, समोर टक्कल, चेहरा – लांब, नाक – सरळ. उजव्या हातावर इंग्रजीत एस.एम असे नाव लिहिलेले व मनगटात शेंदरी रंगाचा धागा. अंगात पांढ–या रंगाची सॅन्डो बनियान, काळ्या रंगाचे जॅकेट आणि हिरव्या रंगचा लोअर घातला आहे.

सदर अनोळखी मृतकाबाबत कोणालाही माहिती असल्यास तपासी अंमलदार धनराज नेवारे (मो. ९८२३४४२२९२) या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन रेल्वे पोलिसांनी केले आहे.

---

# इतर मागासवर्गीय मुले/मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी अर्ज करा

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

इतर मागासवर्गीय प्रवर्गातील मुले / मुलींना उच्च शिक्षण घेता यावे तसेच वाढत्या स्पर्धेमध्ये टिकून राहता यावे, यासाठी शासकीय वसतीगृह सुरू करण्यात आले आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठी व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी फक्त पदवी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. सदर विद्यार्थी १२ वी किमान ६० टक्क्यांनी उत्तीर्ण असावा. इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी मुले/ मुलींच्या शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी १४ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक आशा कवाडे यांनी केले आहे.

असे आहेत प्रवेशाचे निकष व नियमावली : विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा मात्र चंद्रपूर येथील स्थानिक रहिवासी नसावा. विद्यार्थी हा फक्त पदवी प्रथम वर्षातच शिक्षण घेणारा असावा, वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजारांच्या आत असावे. वय ३० वर्षांपेक्षा जास्त नसावे. व्यावसायिक शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमिलेअर व कास्ट व्हॅलिडीटी जोडणे बंधनकारक आहे. सर्व विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला, बोनाफाईड व वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र ओरीजनल जोडावे.

असा करा अर्ज : जाहिरात काळजीपूर्वक वाचून दिलेला क्यूआर कोड स्कॅन करावा. लिंकवर क्लिक करून फॉर्म डाऊनलोड व प्रिंट करावा. अर्जात नमुद संर्पूण कागदपत्रे जोडून सदर अर्ज वसतीगृहात जमा करावा. अधिक माहितीकरीता सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय दूध डेअरी रोड, जलनगर चंद्रपूर येथे संपर्क करावा

# लोणार येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राचे आज आयोजन

## महाराष्ट्रातील विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार



**लोणार । प्रतिनिधी**

स्थानिक लोणार येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय लोणार, अँनालायटिकल केमिस्ट्री टीचर्स अँड रिसर्च असोसिएशन (-उढठ-) आणि अमरावती युनिव्हर्सिटी केमिस्ट्री टीचर्स असोसिएशन (ऑक्टा) यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक ७ डिसेंबर २०२४ रोजी रसायनशास्त्र विषयाचे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे व अँक्ट्राच्या १८ व्या वार्षिक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राची थीम केमिस्ट्री: इनोव्हेशन्स, आपलिकेशन्स अँड सस्टर्नेबिलिटी आहे,सदर चर्चासत्रामध्ये भारतातून रसायनशास्त्र विषययातील तज्ज्ञ प्राध्यापक या चर्चासत्रामध्ये सहभागी होणार आहेत. सदर चर्चासत्राचे आयोजन प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून यामध्ये डॉ. संतोष हरम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे , डॉ.ए.बी नाईक डिपार्टमेंट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, डॉ. विजय मसंद डिपार्टमेंट ऑफ केमिस्ट्री विद्याभारती महाविद्यालय अमरावती तसेच डॉ. जयप्रकाश संगशेट्टी वाय.बी. चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी, छत्रपती संभाजी नगर हे या चर्चासत्रामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत. चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचे प्र-कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरे , सौ .उषाताई गोले , अध्यक्ष,अमृत सेवाभावी संस्था परभणी, प्राचार्य डॉ. विजय नागरे, व्यवस्थापन परिषद सदस्य, सं. गा.बा अ. विद्यापीठ, अमरावती,नारायणराव नागरे महाविद्यालय दुसर बीड, डॉ. सी. एस. पाटील प्रेसिडेंट (ACTRA), डॉ.संतोष बनमेरू, सचिव, अमृत सेवाभावी संस्था परभणी व डॉ.यादवकुमार मावळे, डिपार्टमेंट ऑफ जिओलॉजी सं. गा.बा अमरावती विद्यापीठ, हे उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्राचे प्रमुख आयोजक हे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू ,प्राचार्य डॉ. मजहर फारुकी, मौलाना आझाद कॉलेज, छत्रपती संभाजी नगर, सचिव (ACTRA), माजी यूजीसी standing कमिटी सदस्य तसेच डॉ. नंदकिशोर ठाकरे, प्राचार्य एम.एस. पी. के. पी. टी. महाविद्यालय मानोरा, अध्यक्ष (ACTRA), हे आहेत. सदर चर्चासत्राचा मुख्य हेतू हा आहे की, विविध महाविद्यालय तसेच विद्यापीठांमधून येणारे विद्यार्थी , प्राध्यापक वृंद व रिसर्च स्कॉलर यांच्यामध्ये रसायनशास्त्र या विषयाबद्दल संशोधनपर नवीन माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचविणे व मान्यवरांच्या संवादातून त्यांचे स्किल अपडेट करणे हा असून रसायनशास्त्र संशोधनामध्ये गोडी निर्माण करून अजून त्यामध्ये नवीन रिसर्च करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. चर्चासत्रामध्ये येणारी सर्व शोधनिबंध हे नामांकित जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात येणार आहेत. सदरच्या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये परिसरातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, रिसर्च स्कॉलर, या सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू यांच्यातर्फे करण्यात येत आहे. सदर चर्चा सत्राचे सचिव डॉ. प्रशांत नेतनकर, डॉ.किशोर पुरी डॉ.आरिफ पठाण तर संयोजक म्हणून रसायनशास्त्र विभागातील डॉ.कमलाकर वाव्हळ हे आहेत.

# सुप्रसिद्ध कवयित्री पद्मरेखा धनकर आणि अभिनेत्री प्राजक्ता माळी यांना मसापचा सुनीताबाई गाडगीळ स्मृती साहित्य पुरस्कार



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

माजी आमदार अनंत गाडगीळ यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेला दिलेल्या देणगीतून त्यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ दोन वर्षांपासून एका ज्येष्ठ आणि एका नवोदित कवयित्रीला सुनीताबाई गाडगीळ स्मृती साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.आवंदा या पुरस्कारासाठी सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवयित्री पद्मरेखा धनकर (चंद्रपूर) आणि अभिनेत्री व नवोदित कवयित्री प्राजक्ता माळी (पुणे) यांची निवड करण्यात आली आहे. अनुक्रमे अकरा आणि दहा हजार रुपये रोख आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. १३ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात ज्येष्ठ कवी प्रवीण दवणे यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत, माजी आमदार अनंत गाडगीळ, परिषदेच्या प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार,कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

# श्री संत ज्ञानेश्वर विद्यामंदिर गुरुकुल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

शहरातील नावाजलेले श्री संत ज्ञानेश्वर विद्यामंदिर गुरुकुल, केज येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने नवनवीन उपक्रम व कार्यक्रम राबवले जातात. याच परंपरेनुसार ६ डिसेंबर २०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षशील जीवनप्रवासाची माहिती, भारतीय समाज सुधारणेसाठी केलेले कार्य, संविधान निर्मितीतील योगदान आणि शिक्षणाचे महत्त्व संस्थापक सचिव व सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब कराड यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडले. मेघना सरवदे आणि सुभद्रा मस्के यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका आरती कराड होत्या. प्रमुख उपस्थितीत सहशिक्षिका कावेरी ठोंबरे आणि संतोष मिसाळ होते. विद्यार्थ्यांना सामाजिक जागृती व प्रेरणा देण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.



# विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आदर्श घ्यावा-डॉ.सुधीर मोते

**भद्रावती । प्रतिनिधी**

यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चिचोर्डी, भद्रावती येथे

भारतरत्न, घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुधीर मोते, प्रमुख अतिथी भीष्माचार्य बोरकुटे, किशोर ढोक, प्रेमा पोटदुखे हे व्यासपीठावर उपस्थित होते.भारतरत्न, घटनेचे शिल्पकार, महामानव, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय महाविद्यालयाच्या सभागृहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ सुधीर मोते यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्यार्थी दशेतील प्रसंगावर भर टाकून विद्यार्थ्यांनी



प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. यावेळी आयान शेख, मिनाक्षी गेडाम, मोना वर्मा, माही ढोक, श्रावणी खंडाळे, शरण्या अष्टूनकर, प्रणाली वाटेकर, वैशाली सोनटक्के, श्रुतिका नागपुरे, नेहा कुरेशी , प्रांजली राजुरकर , नताशा नागरे, खूशी आत्राम , आशिका आसामपल्लीवार आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर काहींविद्यार्थिनींनी या गीत गायन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रेमा पोटदुखे, सूत्रसंचालन समीक्षा पोतराजे व प्रा वर्षा दोडके यांनी केले. आभार प्रदर्शन अथर्व श्रीवास्तव यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते

# ६५ रक्तदात्यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना श्रद्धांजली

## १७ वर्षांची रक्तदानाची परंपरा

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

येथील नगरपरिषद प्रांगणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६५ रक्तदात्यांनी रक्तदान करून आदरांजली अर्पण केली. १७ वर्षांची ही रक्तदान शिबिराची परंपरा यंदा अधिक मजबूत झाली आहे.शिबिराचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर रक्तदान समितीने केले होते. उद्घाटन तहसीलदार आशिष विर, नायब तहसीलदार पठारे आणि दत्तापूर पोलिस निरीक्षक ताथोड यांच्या उपस्थितीत झाले. या प्रसंगी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला हारार्पण व मेणबत्त्या लावून शेकडो अनुयायांनी श्रद्धांजली वाहिली.शिबिरात अनिल वहिले, प्रवीण हेंडवे, ज्योती पाटील, डॉ. पंकज कवाडे, डॉ. पवन झटाले, रवि मेश्राम, सुरेन्द्र



फुसाटे, मंगेश सोनोने, आणि सिध्दांत भेंडे यांसारख्या रक्तदात्यांनी सहभाग घेतला. यासह नगरपरिषद कर्मचारी, अधिकारी, आणि मोठ्या संख्येने युवक व महिलांनीही सहभाग नोंदवला.१७ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या शिबिराने धामणगावमध्ये रक्तदानाची एक ऐतिहासिक परंपरा निर्माण केली आहे. यामुळे डॉ. आंबेडकरांच्या विचारांना आणि कार्याला समर्पित आदरांजली अर्पण होत आहे. दत्तापूर पोलिसांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष योगदान दिले.ही परंपरा सामाजिक एकोपा आणि मानवतावादाचा अनुकरणीय आदर्श ठरली आहे.

# संकट काळात विमा रक्कमेचा मोठा आधार-ज्ञानदेव औताडे




**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव येथील संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे यांनी उस उत्पादक सभासद शेतकरी व कामगारांसाठी जनता अपघात विमा उतरविला असुन संकट काळात विमा रक्कमेचा मोठा आधार असल्याचे प्रतिपादन संचालक ज्ञानदेव पाराजी औताडे यांनी केले.

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या केनयार्ड विभागाचे कर्मचारी संजय बाबुराव देशमुख यांचा ५ ऑगस्ट २०२३ मध्ये रस्ते अपघातात मृत्यु झाला होता, त्यांच्या वारस पत्नी श्रीमती बेबीता संजय देशमुख यांना न्यु इंडिया इंशुरन्स कंपनीकडुन दोन लाख रूपयांचा विमा धनादेश संचालक ज्ञानदेव औताडे, संजय औताडे, रमेश आभाळे यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यांत आला त्याप्रसंगी ते बोलत होते. ज्ञानदेव औताडे पुढे म्हणाले की, आपत्ती कधी येईल हे सांगता येत नाही, त्यासाठी प्रत्येकांने विमा घेतला पाहिजे. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांची दुरदृष्टी म्हणून त्यांनी कारखान्यांच्यावतीने उस उत्पादक सभासदांसाठी जनता अपघात विमा उतरविला त्याचा संकटकाळात अनेकांना लाभ मिळाला. कारखान्याचे युवानेते विवेक भैय्या कोल्हे यांनी याकामी न्यु इंडिया इंशुरन्स कंपनीकडे पाठपुरावा करत वारसाकडुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता वेळेत करून घेतली त्यानंतर त्यांना इंशुरन्स कंपनीकडुन २ लाख रूपयांचा अपघाती विमा मंजुर झाला. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी देशमुख परिवारास कशाचीही उणीव भासु न देता सतत सहकार्य केले असे बेबीता संजय देशमुख म्हणाल्या. शेवटी ईश्वर संजय देशमुख यांनी आभार मानले.

# घाटशेंद्रा येथ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



**कन्नड । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव, आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त घाटशेंद्रा येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विश्वरत्न मित्र मंडळाच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात डॉ. आंबेडकर यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. या प्रसंगी अनिल गायकवाड, सतीश गायकवाड, संदीप गायकवाड, नितीन पाचोने, नितीन बवास्कर, रोहन गायकवाड, सुमित गायकवाड, रोहित गायकवाड, आशीष बवास्कर, प्रीतेश गायकवाड, किरण भीवसने आणि महेंद्र गायकवाड यांनी अभिवादन केले. डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक न्याय, समानता आणि शिक्षणाचे महत्त्व यावरील विचार यावेळी उपस्थितांना सांगण्यात आले. या कार्यक्रमातून उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या आदर्शांवर चालण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मोहिते पाटलांना लढवय्ये नेतृत्वाची भीती लोटांगण घालणाऱ्या आमदारांचीच अपेक्षा

**माळशिरस । प्रतिनिधी**

गावपातळीपासून संसदीय राजकारणापर्यंत लोकप्रतिनिधींनी जनतेच्या समस्या सोडवून विकासकामांना प्राधान्य दिले पाहिजे. मात्र रणजितसिंह मोहिते पाटलांसारखे काही प्रस्थापित नेते स्वतःच्या स्वार्थासाठी लोकप्रतिनिधींना आपल्या तालावर नाचवत असल्याचा आरोप केला जातो. याच कारणामुळे त्यांना लढवय्ये नेतृत्व नको असून, त्यांच्या पुढे लोटांगण घालणाऱ्या प्रतिनिधींचीच आवश्यकता वाटते, असे चित्र उभे राहिले आहे.

एससी आरक्षित माळशिरस मतदारसंघात रामभाऊ सातपुते यांनी आमदार म्हणून जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले आणि विकासकामे प्रभावीपणे राबविली. त्यांनी कोरे लेटरहेड देण्यास नकार दिल्यामुळेच मोहिते पाटलांच्या नाराजीत भर पडली. याउलट, माजी आमदार हनुमंतराव डोळस यांनी मोहिते पाटलांच्या तालावर काम केले, हेही स्थानिकांच्या चर्चेत आहे. मोहिते पाटलांची सरंजामी वृत्ती त्यांना खड्ड्यात घेऊन गेल्याचा आरोप केला जातो. २००९ मध्ये पंढरपूरातील पराभवानंतर त्यांची राजकीय कारकीर्द ढासळली. मात्र, सत्ता टिकवण्यासाठी त्यांनी तालमीच्या बाहुल्यांसारखे आमदार निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु रामभाऊ सातपुते यांच्या सक्रियतेने त्यांच्या मनसुब्यांना धक्का बसला.रामभाऊ सातपुते यांचा प्रभाव कमी करण्यासाठी रणजितसिंह मोहिते पाटलांनी



उत्तम जानकरांना आमदार केले. मात्र, यामध्ये पक्षनिष्ठेऐवजी शरद पवारांशी जवळीक राखल्यामुळे पक्षीय कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.मोहिते पाटलांचे राजकारण जनहितापेक्षा स्वहिताला प्राधान्य देणारे असल्याचा आरोप होतो. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील मतदारसंघाला लढवय्ये नेतृत्वाची नव्हे, तर स्वतःच्या स्वार्थासाठी काम करणाऱ्या प्रतिनिधींचीच गरज असल्याचे दिसून येते. माळशिरस मतदारसंघातील जनतेने नेत्यांच्या कारवायांचे भान ठेवून खरे नेतृत्व निवडण्याची गरज आहे, अशी स्थानिकांची भावना आहे.

# महानुभाव श्रीदत्तमंदिर साठगाव येथील यात्रा महोत्सवाचे महत्व व इतिहास

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील अगदी शेवटच्या टोकावर वसलेले ६० गाव हे गाव. चंद्रपूर, नागपूर व भंडारा या तिन्ही जिल्ह्याच्या सीमा हद्दीवर वसलेलं तथा चिमूर-कांपा-नागपूर मार्गावरील शंकरपूर, कांपा, भुयार, निलजफाटा व भिवापूर या गावापासून ७ ते ८ कि. मी. अंतरावर आड बाजूस असलेल छोटस गांव साठगाव. एकेकाळी साठ घराची वस्ती असलेल आणि आता अंदाजे १८०० ते २००० लोकसंख्या असणारं हे गाव. भोसलेकालीन काळात काही नैसर्गीक आपत्ती व पेंढारी (लुटारू) यांच्या लुटीत पूर्णपणे उध्वस्त झाले होते. या गावाचे आकर्षण म्हणजे आज गावालगतच्या टेकडीवर उभे असलेल श्रीदत्तात्रेय प्रभूचे भव्य पुरातन मंदिर.याबाबत थोडक्यात असे कि, इ.स. १७८५ मध्ये चांदापूर (जी.चांदा) राजे भोसले यांचेशी इंग्रजाच्या लढाईचा उल्लेख महानुभाव ग्रंथामध्ये आला आहे. त्यावेळी माहूर संस्थान मधून भोसलेकालीन राज्याचा कारभार पहिला जात असे. त्याकाळात राजे भोसले यांचेकडून विजयी सेनाप्रमुख गावंडे कुटुंबातील पराक्रमी व्यक्तीला परागणे 'साठगाव' चिमूर हा भाग मालगूजारीत मिळाला. गावंडे कुटुंब मुळ यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस गावचे यांचा माहूर संस्थानशी पूर्वीपासून सबंध होता.

गावंडे कुटुंब साठगावला मालगुजार म्हणून स्थाईक झाले व त्यांनी श्रीदत्तात्रेय प्रभू यांचे निद्रास्थान देवदेवेश्वरी संस्थान, माहूर येथे खाचर बैलाने देवदर्शानाकरिता माहुरवारी सुरु केली. पूर्वीच्याकाळी तीर्थयात्रेवरून परत आल्यानंतर गावाचे शिवेवर किंवा मंदिरात एक रात्र मुक्काम केल्या जात असे. अशाच एका वारीमध्ये मालगुजार गावंडेपाटील यांनी सुध्दा त्याकाळी गावापासून दूर असलेल्या टेकडीवर मुक्काम केला असता त्यांना स्वप्न पडले मी तुझे सोबत आहे. याच स्थळी माझी पुजेची व्यवस्था कर या गावाचे भाग्य उदयास येईल. तेथे पाहणी केली असता 'सर्वतीर्थ' माहूर येथील विशेष असल्याचे दिसले. तेव्हापासून झोपडीवजा मंदिरात विशेषाची स्थापना करून त्रिकाळ पूजाअर्चा सुरु केली असून आजही नित्यक्रमाने सुरु आहे. गावंडे कुटुंबाचे स्वप्न साकार झाल्यानंतर इ.स. १८६४ मध्ये श्रीमती राधाबाई धर्माजीपाटील गावंडे यांनी साठगाव येथे श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिराचे बांधकाम सुरु केले व तेव्हापासून येथे तीन दिवसीय श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव सुरु झालेला असून आता श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव दोन दिवसाचा करण्यात आलेला आहे. राधाबाईने माहूरवारी बंद करून गोंदिया जिल्ह्यातील डाकराम-सुकळी (चक्रधर स्वामीचे चरणाकिंत स्थान) येथील वारी सुरु केली ती आजही सुरु आहे. राधाबाई नंतर त्यांचा मुलगा कवडूजीपाटील यांनी तर त्यानंतर रामचंद्रजी, हरिचंद्रजी, देविदासजी व उमेशजीपाटील यांनीही श्रीदत्तजयंती यात्रेचा वारसा जोपासला असून आजही पुढील पिढीकडून हे कार्य सुरु आहे. न्यास नोंदणी नंतर अध्यक्ष म्हणून कै.कवडूजी धर्माजीपाटील गावंडे, कै.रामचंद्र कवडूजीपाटील गावंडे व श्रीमती लीलाबाई रामचंद्रपाटील गावंडे यांनी कार्यभार सांभाळलेला आहे.सन १९८० मध्ये कवडूजीपाटील यांनी कै.म.जयकृष्णबाबा दर्यापूरकर (वणी) यांचेकडून संन्यास दिक्षा घेतली व त्यानंतर ते साठगाव येथिल श्रीदत्त मंदिरात वास्तव्यास राहू लागले. त्यांच्या पत्नी कासुबाई व मुलगी शेवंताबाई ह्या सुध्दा वृद्धापकाळात मंदिरात वास्तव्यास होत्या. तसेच देवदेवेश्वरी संस्थान, माहूर चे विद्यमान पिठाधीश महंत श्री माहुरकरबाबा उर्फ मधुकर शास्त्री कवीश्वर हे पंधरा वर्षे, महंत सुधाकरबाबा संन्याशी (उमरखेड) हे दोन वर्षे व कै.त. भागुबाई पातुरकर (मनसळ) ह्या बारा वर्षे साठगाव येथिल श्रीदत्त मंदिरात वास्तव्यास होत्या. या पुरातन महानुभाव श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिराची उभारणी चुनखडी मिश्रित विटांनी करण्यात आली असून समोरील सभामंडप नंतर बांधून दिलेला आहे. श्रीदत्तात्रेय प्रभूच्या विशेषावर अत्यंतवेधक व कलाकुसरयुक्त चांदीचा मुखवटा बसविला आहे. लाकडी रथावरील नक्षीकाम उत्कृष्ट कलेचा नमुना असून हा लाकडी रथ साठगाव येथील कै.राखुंडे परिवार यांनी तयार केला आहे. साठगाव येथील श्रीदत्तप्रभूची महिमा पंचक्रोशीत असून चैत्र पौर्णिमा, आषाढी पौर्णिमा, नारळी पौर्णिमेस भाविक मंडळी बहु संख्येने पूजाअर्चा करण्याकरिता येत असतात. काही भक्तगण पाच दिवसापासून तर सव्वा महिन्यापर्यंत धरणे (वास्तव्यास) असतात. नवरात्रामध्ये सदभक्ताकडून येथे नउ दिवस पंगती असतात. मार्गशीर्ष महिन्यात भक्तजन सह्भोजनाकरिता येत असतात.

मार्गशीर्ष पौर्णिमेपासून येथे श्रीदत्तजयंती यात्रा महोत्सव असते. प्रथम दिवशी सकाळी श्रीदत्तप्रभूचा जन्मोत्सव, ध्वजारोहण साजरा करण्यात येते तर सायंकाळी ब्यांड व भजनाच्या गजरात तर दत्ताप्रभूचे नामघोषात विशेषाची रथशोभा यात्रा काढण्यात येते. गावामध्ये या रथशोभायात्रेचे ठीकठिकाणी स्वागत करून विशेषास विडाअवसर व उपहार समर्पण करीत असतात. तर गावातील काही सद्भक्त मंडळी रथशोभा यात्रेनिमित्य नास्ता, अल्पोपहार, चहापान व फळांचे वाटप करीत असतात. दुस-या दिवशी




**दरवर्षी प्रमाणे यावर्षीही श्रीदत्त मंदिर साठगांव येथे श्रीदत्त जयंती यात्रा महोत्सव आयोजित केलेला आहे. त्यानिमीत्य दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोज रविवारला रात्रौ ६.०० वाजता रथ शोभायात्रा तर दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोज सोमवारला दुपारी २.०० वाजता प्रवचन, किर्तन, गोपालकाला व महाप्रसाद होईल. तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे आणि प्रवचन कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी विनंती करण्यात आली आहे.**

(मार्गशीर्ष प्रतिपदा) भजन, प्रवचन, कीर्तन, दहीहंडी, गोपाळकाला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. तर गावातील युवक मंडळी यात्रेनिमित्य आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, मैदानी खेळ व नाटकाचे आयोजन करीत असतात. वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजीबाबा यांचा भजनाचा कार्यक्रम सन १९७१ ला साठगाव येथे जि.प. प्राथमिक शाळेच्या उदघाटनप्रसंगी झाला असून त्यावेळी त्यांनी आयुर्वेदाचार्य डॉ.भैरवारदादा सह श्रीदत्तमंदिरास भेट देवून दर्शन घेतले. मध्यंतरीच्या काळात महानुभाव पंथीयांची पालखी यात्रा श्रीक्षेत्र रीद्धपूर येथील यक्षदेव मठातील कै.आचार्य म.मुरारीमल्लबाबा व कै.म.प्रभाकरशास्त्री यक्षदेव त्याचप्रमाणे कै.म.गोपिराजबाबा (जुने) तर सन २००२ मध्ये म.विद्याधरदादा पंजाबी (वाघोदा) हे मार्ग मंडळीसह साठगाव येथील श्रीदत्त मंदिरात धर्म प्रचारासाठी आलेले होते. सन २०२२ मध्ये जाधववाडी येथील आचार्य मोठेबाबा मार्ग मंडळीसह पुयारदंड, त.भिसी येथे वास्तव्यास आले असताना साठगाव येथील श्रीदत्त मंदिरात दर्शनाकरिता आले होते. तसेच म.श्री. नागराजबाबा उर्फ गोपिराजबाबा शास्त्री (रीद्धपूर), म.श्री.न्यायबांसबाबा उर्फ सैंगराज शास्त्री (मकरधोकडा), साहित्याचार्य म.श्री.बा.भो.शास्त्री (करमाड), म.श्री.एकोबासबाबा उर्फ वसंतराज शास्त्री (खुटाळा चंद्रपूर), म.श्री.मुधोव्यासबाबा उर्फ संजयराज शास्त्री (एकार्जुना वरोरा), म.श्री.परसराजबाबा उर्फ संतोषराज शास्त्री (वणी), म.श्री.कळमकरबाबा (गाढेजळगाव), म.श्री.दत्तराजबाबा शेवलीकर (सोलापूर), म.श्री.प्रभाकारदादा कपाटे (भोकर), म.श्री.सायराजदादा पुजदेकर (नाशिक), म.श्री.गोविंदराजदादा बिडकर (लातूर), म.श्री.निर्मलमुनी बाभूळगावकर (जालीचादेव), म.श्री.उध्दवराज दिवाकरबाबा (लोणारा भद्रावती), म.श्री.देपेराजबाबा (नागपुर), म.श्री.कृष्णामुनी (रीद्धपूर), म.श्री.वंकीराजदादा अस्टूणकर (डाकराम सुकळी), म.श्री.कान्हेराजदादा (काटोल), म.श्री.संजयदादा भोजने (जालीचादेव), म.श्री.योगीराजदादा (हदगाव), त.पुष्पाताई विराट (मकरधोकडा), त.डॉ.मालतिताई बिडकर, त.विमलताई शेवलीकर (विठ्ठलवाडी नागपूर), त.विमलताई शीवनेकर (दहेगाव), किर्तनकार श्री.दामोधरशाहीर वाजीरगावकर (नांदेड), श्री.दादाराव उके (नेर), म.बिडकरबाबा (सातारा), म.माधव्यासबाबा (सालबर्डी), श्री मनोहर फाये, श्री दुलीचंद तुरकर, श्री अमर ठमके, योगेश कपाटे, श्री सुरेशभाऊ वाईन्देशकर, ह.भ.प.श्री पंजाबराव अंभोरे, ह.भ.प.चांगदेवदादा (सालोरी), ह.भ.प. नामदेवदादा (टाका), कै.म.राजेन्द्रप्रसाद शेवलीकर उर्फ म.सुगावकर (बदनापूर), कै.म. अशोकशास्त्री माहुरकर (माहुर), कै.म. दयालमुनी अन्कुलनेरकर (वडवाडी, पैठण), कै.म.चक्रपानीबाबा (मौदा), कै.म.शिवनेकरबाबा (दहेगाव), कै.म.विलासशास्त्री (वणी), कै.म.नागापुरकरबाबा (चिंचभूवन), राष्ट्रीय किर्तनकार कै.म.कपाटेबुवा, कै.म.यादोबुवा (टाका), कै.म.श्यामसुंदरशास्त्री (नागपूर) कै.म.श्रावणबुवा (साठगाव), कै.माणिकलाल बारसागडे, समाजसेविका शकुंतलाबाई कपाटे, आदींनी श्रीदत्त जयंती यात्रा महोत्सवानिमित्य उपस्थित राहून प्रवचन, किर्तन, भजन यामधून महानुभाव पंथाचे तत्वज्ञान, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा, अहिंसा, आत्महत्या, बुवाबाजी, कर्मकांड, स्वच्छता अभियान, समाजप्रबोधन याबाबत जनजागृती केलेली आहे.त्याचप्रमाणे देशभक्त वामनराव गावंडे, कै.माजी खासदार नामदेवराव दिवटे, कै.माजी विधानसभा उपाध्यक्ष मो.वी.टेमुर्डे, कै.माजी आमदार मेश्राम साहेब, कै.माजी आमदार वसंतराव इटकेलवार, माजी राज्यमंत्री डॉ.रमेश गजभे, माजी आमदार डॉ.अविनाश वारजूकर, माजी आमदार सुधीर पारवे, जागतिक कृशीतज्ञ डॉ.रमेश ठाकरे, माजी कुलगुरू वाय.एम.टाले, न्युरो सर्जन डॉ. मिलिंद देवगावकर, डॉ.शैलेजा देवगावकर, कै.डॉ.रा.बो.मेश्राम, कै.डॉ.तू.वी.गेडाम, माजी जि.प.अध्यक्ष संतोष रावत, माजी जि.प.अध्यक्ष डॉ.सतीश वारजूकर, माजी जि.प.अध्यक्ष संतोष कुमरे, श्री सुधाकरराव मेंघर, साजन शेंडे, प्रा.बी.जी.रडे, सर्वज्ञ विचारमंच तळोधी आदी मान्यवर मंडळी यांनी यात्रेनिमित्य सदिच्छ! भेटी दिलेल्या आहेत. या मंदिरास तिर्थक्षेत्राचा क वर्ग दर्जा प्राप्त असून तिर्थक्षेत्र विकास निधी योजनेअंतर्गत सभामंडप, धर्मशाळा, स्वच्छतागृह, पाण्याची छोटी टाकी, पेव्हिंग ब्लाक फिटिंग, संरक्षण भिंत इ. कामे करण्यात आलेले आहेत. तसेच अर्धवट, संरक्षण भिंतीचे काम, मंदिरामागील गावाला जोडणारा अंदाजे २५० मीटरचा रस्ता पथदिव्यासह करने अत्यंत गरजेचे आहे. सदर पुरातन मंदिराचे आतील भागाचे नुतनीकरण विद्यमान महंत श्री माहुरकरबाबा उर्फ मधुकर शास्त्री कवीश्वर यांचे आशीर्वादाने, विनोद रा. गावंडे यांचे पुढाकाराने, सदभक्त व आप्तेष्ट मंडळी यांचे सहकार्याने पूर्ण केले असून मंदिराचे बाहेरील भागाचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सर्व गावकरी तथा परिसरातील सदभक्त व आप्तेष्ट मंडळी यांचे अपार श्रध्दा व स्नेहाने गावंडे परिवार श्रीदत्तात्रेय प्रभू मंदिर साठगाव येथिल श्रीदत्तात्रेय प्रभू जयंती यात्रा महोत्सव आजही मोठ्या उत्साहाने साजरा करतात. आणि सदभक्त मंडळी मोठ्या संख्येने येथे येवून श्रीदत्तप्रभू चरणी लीन होतात.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आचरणात आणून समतामूलक समाज घडवावा-डॉ.गुलवाडे

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन महायुतीतर्फे आदरांजली कार्यक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महायुतीतर्फे ६ डिसेंबर २०२४ रोजी आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संदेश देत समता, न्याय, आणि बंधुतेच्या मूल्यांची उजळणी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा महामंत्री व एछढ सर्जन डॉ. मंगेश गुलवाडे होते. त्यांनी बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनाचा उहापोह करत सांगितले की, बाबासाहेबांनी दिलेला शिक्षण, संघटन, आणि संघर्षाचा मंत्र हा समाज सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांचे विचार आचरणात आणल्यानेच खऱ्या अर्थाने समतामूलक समाज घडवता येईल.

कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे



जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ हजारे, रिपब्लिकन पार्टी (आठवले गट) चे जिल्हाध्यक्ष जयप्रकाश कांबळे, माजी नगरसेविका छबूताई वैरागडे, भाजपा पदाधिकारी नम्रता ठेमस्कर, रुद्रनारायण तिवारी, धनराज कोवे, राकेश बोमनवार, ज्योतीताई वेलके, रामकुमार आक्कापल्लीवार, प्रवीण उरकुडे, अमित निरंजने, सोहम बुटले यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांचीही उपस्थिती होती. या प्रसंगी बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित समाज सुधारण्यासाठी नव्या पिढीला प्रेरित करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. डॉ. मंगेश गुलवाडे यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा सन्मान करत सांगितले की, बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांचे विचार आचरणात आणणे व सामाजिक न्यायासाठी अविरत प्रयत्न करणे.

# महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीप्रसंगी जल्लोषपूर्ण स्वागत





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचा दिवस म्हणून ६ डिसेंबर २०२४ ची नोंद झाली आहे. या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी शपथ घेतली. या ऐतिहासिक क्षणी भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून चंद्रपूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात जल्लोष साजरा करण्यात आला.

चंद्रपूर जिल्ह्यातील पाचही विधानसभेच्या मतदारसंघांतून महायुतीच्या डॉ. सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, बंटी भांगडिया, देवराव भोंगळे, आणि करण देवतळे या उमेदवारांनी विजय मिळवला. या यशस्वी नेतृत्वामध्ये सुधीर मुनगंटीवार आणि हंसराज अहिर यांच्या मार्गदर्शनाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

कार्यकर्त्यांना उद्देशून सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार महाराष्ट्राच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. चंद्रपूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचा प्रगतीचा मार्ग सुकर करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. या जल्लोषामध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे माजी महानगर अध्यक्ष व जिल्ह्याचे महामंत्री डॉ. मंगेश गुलवाडे, विजय राऊत, खुशाल बोंडे, प्रकाश देवतळे, प्रकाश धारणे, सुभाष कासनगोट्टूवार, संदीप आवारी, संजय कांचरल्लावार, रवी आसवणी, विशाल निंबाळकर, नम्रता ठेमसकर, छबूताई वैरागडे, मनोज पाल, किरण बुटले, रवी लोणकर, राकेश बोमनवार, मुग्धा खांडे, आणि तृष्णा गेडाम आदी मान्यवर उपस्थित होते. महायुतीच्या सरकारने महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी नवा अध्याय लिहिण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, या सरकारच्या माध्यमातून राज्याच्या विकासाचा वेग अधिक गतीमान होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# संभाजीनगर जिल्ह्यातील प्रसिद्ध उद्योजक हरेश पालेजा यांचे निधन

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील श्रीनाथ बिल्डकॉन चे प्रसिद्ध उद्योजक आणि शासकीय गुत्तेदार हरेश पालेजा यांचे शुक्रवारी निधन झाले. ग्रामीण भागात रोजगार निर्माण करून शेकडो कुटुंबांना आधार देणारे आणि तरुण उद्योजकांना प्रेरणा देणारे पालेजा यांच्या जाण्याने तालुक्यात शोककळा पसरली आहे.



पालेजा यांनी अनेक वर्षे गंगापूर तालुक्यात आर्थिक आणि सामाजिक योगदान दिले. त्यांच्या पार्थिवावर वैजापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने तालुका आणि जिल्ह्यातील उद्योगविश्वात हळहळ व्यक्त होत आहे.

# लोकमान्य महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**वरोरा । प्रतिनिधी**

लोक शिक्षण संस्था, वरोडा संचालित लोकमान्य महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन ६ डिसेंबर २०२४ रोजी साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री यांनी भूषविले, तर प्रमुख वक्ते म्हणून समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. श्रीनिवास पिलगुलवार उपस्थित होते.

डॉ. पिलगुलवार यांनी धर्म, धम्म, राजकारण आणि आरक्षण याबाबत बाबासाहेब आंबेडकरांचे पुरोगामी विचार या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी प्रस्थापित व उपेक्षित समाजातील स्पर्धा, दलित चळवळीची सद्यस्थिती, शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीतील बाबासाहेबांच्या योगदानावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात डॉ. जयश्री शास्त्री यांनी महिलांच्या प्रगतीत डॉ. आंबेडकरांची भूमिका आणि दलित व वैचारिक




साहित्याचे महत्त्व यावर विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन रासेयोचे सहकार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीकांत पुरी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. रवींद्र शेंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

# रोटरी क्लब वरोरा व शेषरत्न संस्थेच्या वतीने ८ डिसेंबरला रक्तदान शिबिराचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील शेषरत्न बहुउद्देशीय संस्था आणि रोटरी क्लब वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ८ डिसेंबर रोजी महावीर भवन, डोंगरवार चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत चालणार असून चंद्रपूर येथील सरकारी रक्तपेढीच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे.

सध्या चंद्रपूर, वर्धा, नागपूरसारख्या शहरांतील सरकारी व खाजगी रक्तपेढ्यांमध्ये २० ते २५ टक्केच रक्तसाठा उपलब्ध असल्याने रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन शेषरत्न बहुउद्देशीय संस्था आणि रोटरी क्लब वरोराने हा उपक्रम आयोजित केला आहे.



थॅलेसेमिया, सिकलसेल, कर्करोग, डेंग्यू, प्रसूती आणि अपघातग्रस्त रुग्णांसाठी वेळेवर रक्त उपलब्ध होणे आवश्यक आहे. वेळेवर रक्त मिळाले नाही तर गंभीर परिणाम होऊ शकतात.आयोजक धिरज लाकडे (अध्यक्ष, शेषरत्न बहुउद्देशीय संस्था) आणि बंडु देऊळकर (अध्यक्ष, रोटरी क्लब वरोरा) यांनी अधिकाधिक नागरिकांना रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे. हा सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपले कर्तव्य पार पाडावे, असे ते म्हणाले.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दारात चालू असलेला बैठा सत्याग्रह सामाजिक कार्यकर्ते सोनटक्के यांनी आज मागे घेतला

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी: गेल्या तीन दिवसांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दारात चालू असलेला बैठा सत्याग्रह सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनी आज मागे घेतला.अँड.प्रताप ढाकणे यांनी आज या सत्याग्रहाला भेट देत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत अनधिकृतपणे गटारीचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे लेखी पत्र बांधकाम विभागाने दिल्यानंतर आंदोलन मागे घेतले.

शहरातील शेवगाव रोडवरील जुने बसस्थानक ते नवीन बसस्थानक या मार्गावर गटारीचे काम नगरपरिषदेकडून चालू होते.मात्र,हे का अनधिकृतपणे चालू असल्याचे निवेदन देत सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनी नगरपरिषद व बांधकाम विभाग यांना देत संबंधित ठेकेदाराविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली होती.पण,निवेदन देऊनही दोन्ही विभागाकडून काहीच कारवाई होत नसल्याचे पाहून गेल्या तीन दिवसांपासून सोनटक्के यांनी बांधकाम विभागाच्या दारात बैठा सत्याग्रह चालू केला होता.यानंतरही संबंधित विभागाकडून ठोस अशी कारवाई केली जात नव्हती.त्यानंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अँड.प्रताप ढाकणे यांनी बांधकाम विभागाच्या दारात चालू असलेल्या सत्याग्रहाला भेट दिली.यावेळी सर्व कागदपत्रांची पाहणी



केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरत खडेबोल सुनावले.संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याचे पत्र घेतल्याशिवाय उठणार नाही असा पवित्रा घेताच बांधकाम विभागाचे अधिकारी असिफ सय्यद यांनी लेखी पत्र दिल्यानंतर आंदोलन मागे घेतले.शहरात विकासकामे करतांना आमचा कुठलाही विरोध नसून फक्त काम कायद्याच्या चौकटीत व्हावे.संबंधित गटारीचे काम मुख्य रस्त्यापासून अगदी जवळ असून भविष्यात रस्ता रुंदीकरण करण्याचे काम ठरल्यास गटारीचा अडथळा निर्माण होऊ शकतो असे अँड. प्रताप ढाकणे यांनी सांगितले.यावेळी आंदोलनात बंडू पाटील बोरुडे,विष्णूपंत पवार,सीताराम बोरुडे,वैभव दहिफळे,देवा पवार,संदीप काटे,गोरक्ष ढाकणे,हुमायून आतार,युसूफ शेख,नवाब पठाण,सचिन नागापुरे,विशाल उदमले,शंनो पठाण,सोमनाथ टेके,संतोष लबडे,प्रकाश केळगंद्रे,संतोष मेघुंडे,सुखदेव मर्दाने,सोमनाथ रोडी,नंदकुमार डाळिंबकर,सुरेश हुलजुते आदी उपस्थित होते.यावेळी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्यासह पोलीस कर्मचारी मोठ्या उपस्थित होते.

**“ दरम्यान,विधानसभा निवडणुकीत पराभव होऊन देखील अँड.प्रताप ढाकणे हे सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्या साठी झगडत आहेत.नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहेत त्यामुळे कार्यकर्त्यांना देखील लढण्यास बळ मिळत असल्याने कार्यकर्ते समाधान व्यक्त करत आहेत.**

**“ दरम्यान,या प्रकरणाला पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे हे देखील तितकेच दोषी असून त्यांनी बांधकाम विभागाची रीतसर परवानगी घेऊन संबंधित ठेकेदाराला काम करण्याचे आदेश देण्याची गरज होती.पण मुख्याधिकारी हे पण 'हम करे,सो कायदा' याप्रमाणे वागत असून पालिकेवर प्रशासकराज असल्याने त्यांच्याकडून कायदा पायदळी तुडवला जात आहे.त्यामुळे त्यांच्यावर देखील कायदेशीर कारवाई करण्यात यावी–अरविंद सोनटक्के,सामाजिक कार्यकर्ते**

# आदिवासी समाजासाठी लढणारा मोठा नेता हरपला

## ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचं निधन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर :भाजपचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचं निधन झालं आहे. त्यांनी वयाच्या ८४ व्या अखेरचा श्वास घेतला आहे. मधुकर पिचड यांना १५ ऑक्टोबरला ब्रेन स्ट्रोकचा झटका आला होता. त्यांच्यावर गेल्या दीड महिन्यांपासून नाशिकच्या एका रुग्णालयात उपचार सुरु होते.

पण त्यांची आजारपणासोबत सुरु असलेली झुंज आज संपली आहे. मधुकर पिचड यांच्या निधनामुळे भाजपची वैयक्तिक मोठी हानी झाली आहे. मधुकर पिचड यांचं आदिवासी भागात मोठं काम आहे. ते राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री देखील होते.

ते अहिल्यानगर अकोले विधानसभा मतदारसंघातून १९८० ते २००४ या काळात तब्बल ७ वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. ते मार्च १९९५



ते जुलै १९९९ या काळात विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. त्यांनी २०१९ मध्ये मुलगा वैभव पिचड यांच्यासोबत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर भाजपसाठी त्यांनी अहोरात्रदेखील काम केलं होतं.

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



**बीड । प्रतिनिधी**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बीड शहरातील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महात्मा फुले समता परिषद, बीडच्या वतीने पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष आणि समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ड. सुभाष राऊत उपस्थित होते. त्यांच्यासमवेत शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, ज्ञानेश्वर राऊत, ऋषिकेश गनगे, मनोज वाघमारे आणि अन्य समता सैनिकांनी अभिवादन केले. कार्यक्रमाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांप्रती आदर व्यक्त करण्यात आला आणि सामाजिक समतेच्या दिशेने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# भगवान विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी अभिवादन




**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित भगवान विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मुसा शेख होते. पर्यवेक्षक अंकुश आघाव, गर्जे, ढोकर, डोळे, एन.एम. जाधव यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

एस.आर. वडमारे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव करत महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय समारोपात शेख यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या डॉ. आंबेडकरांच्या त्रिसूत्रीचा उल्लेख करत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डी.पी. डोळे यांनी मानले. या प्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामूहिक प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## देववाणी दिव्यांग बहुउद्देशीय संस्था चंद्रपूर आयोजित

# राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ८ डिसेंबर रोजी ऑडीशन राऊंड

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर: बाल कलावंतांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी देववाणी दिव्यांग बहुउद्देशीय संस्था, चंद्रपूरतर्फे राज्यस्तरीय गायन, वादन, नृत्य व फॅशन शो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या ऑडीशन राऊंडचे आयोजन ८ डिसेंबर २०२४ रोजी चंद्रपूर येथील चोर खिडकी परिसरातील ब्राईट इंग्लिश स्कूलमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत होणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून बालकलावंतांना आपली कला सादर करण्याची अनोखी संधी मिळणार असून, त्यांच्या कलागुणांना नवा आयाम मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे.



### राज्यभरातील कलावंतांना संधी

**ही स्पर्धा विशेषतः बालकलावंतांसाठी आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेद्वारे त्यांच्यातील गायन, वादन (इन्स्ट्रुमेंट), नृत्य आणि फॅशन शो यांसारख्या विविध कलात्मक कौशल्यांना एक हक्काचं व्यासपीठ मिळणार आहे.**

### अंतिम फेरीचे आयोजन १४ डिसेंबरला

**ऑडीशन राऊंडमधून निवड झालेल्या प्रतिभावंत बालकलावंतांची अंतिम फेरी १४ डिसेंबर २०२४ रोजी चंद्रपूरातील प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह येथे भव्य स्वरूपात मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.**

**संपर्कासाठी माहिती–स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक दिव्यांग कलावंतांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन देववाणी संस्थेतर्फे करण्यात आले आहे. प्रवेश व इतर अधिक माहितीसाठी मेघना शिंगरू (मोबाईल क्रमांक: ९५५२७००३८४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

## गुणवंत व संस्कारीत विद्यार्थी घडविणे म्हणजे शिक्षण

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची शिक्षण विभागासाठी 'दशसूत्री'

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांच्या कोवळ्या वयातच त्यावर संस्कार करुन शिक्षण द्या. त्यामुळेच देशाचा उद्याचा नागरिक गुणवंत आणि संस्कारीत होईल, असे गुणवंत आणि संस्कारीत विद्यार्थी घडविणे म्हणजेच शिक्षण होय,अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज शिक्षण विभागासाठी 'दशसूत्री' कार्यक्रम दिला. आगामी या काळात शाळांमध्ये या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

येथील देवगिरी महाविद्यालयात शिक्षण विभागाची जिल्हास्तरीय कार्यशाळा आज पार पडली. गुरुदेव रविंद्रनाथ टागोर सभागृहात आयोजीत या कार्यशाळेस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) अरुणा भुमकर तसेच जिल्ह्यात १२८ केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी शिक्षण विभागासाठी गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडवितांना राबवावयाच्या शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांना सुसंस्कारीत करण्यासाठी शाळांमध्ये कोणते उपक्रम राबवावे याविषयी आपले सादरीकरण केले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, एकंदर शैक्षणिक प्रगतीचा आलेख पाहता त्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सद्यस्थिती लक्षात घेता त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजातील सर्वस्तरातील विद्यार्थी हे गुणवत्तापूर्ण असले पाहिजे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. त्यासाठी जुन्या अध्यापन पद्धतीत बदल करुन साचेबद्ध शिक्षण पद्धतीत आवश्यक सुधारणा करणे आवश्यक आहे. हे करत असतांना संस्कार, संस्कृतीपासून मुले दूर जात आहेत हे ही एक वास्तव आहे. मुलांमध्ये देशप्रेम, आईवडील गुरुजनांविषयी आदरभाव याचा अभाव दिसून येत आहे, असेही त्यांनी सांगितले. प्राथमिक शिक्षणादरम्यानच मुलांवर या संस्कारांचे बीजारोपण केले तर देशाचे भविष्य उज्ज्वल होईल.यावर उपाययोजनांचा भाग म्हणून जिल्हाधिकारी स्वामी यांनी दहा सुत्रे सांगितली. त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढ करत असतांना त्यांचे आरोग्य, आनंददायी शिक्षण, तंत्रस्नेही विद्यार्थी घडविणे, महिलांविषयी आदरभाव, स्व अभिव्यक्तिस प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास करणे असे विविध उपाय त्यांनी सांगितले.जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, शिक्षक हा केवळ एक पेशा नसून देशाची भावी पिढी घडविण्याचे काम आपण करीत असतात. याचे भान ठेवून आपण हा कार्यक्रम आपल्यामार्फत शाळाशाळांमध्ये राबवावा व आपल्या जिल्ह्यातून चांगले विद्यार्थी घडवा. हेच विद्यार्थी उद्याचे देशाचे आधारस्तंभ असतील.प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी केले.गुणवत्ता पूर्ण शिक्षण प्रदान करणे.स्पर्धाक्षम, आरोग्यक्षम, संस्कारक्षम, महितीतंत्रज्ञान कुशल व तंत्रस्नेही विद्यार्थी घडवणे. कौशल्यपूर्ण व स्वावलंबी विद्यार्थी घडवणे. आनंददायी, नाविन्यपूर्ण व रचनात्मक शिक्षण देणे.मुलींची सुरक्षितता, महिलांचा सन्मान वाढवणे त्यांच्यातआत्मविश्वास जागृती करणे. स्वअभिव्यक्तीस प्रोत्साहन देऊन सुप्त गुण शोधून त्यास चालना देणे,नवशिक्षण पद्धतीचा अवलंब करुन अद्यावत ज्ञानमय शिक्षक तयार करणे.

# देवीचा माळ येथे जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजर

**सोलापूर । प्रतिनिधी**

श्री जगदंबा कमला भवानी मूकबधिर निवासी विद्यालय, श्री देवीचा माळ येथे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. डॉक्टर हेलन केलर आणि संस्थेचे संस्थापक कै. पाथरूट गुरुजी यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लीड स्कूलचे प्राचार्य बिपिन दास होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय काळे आणि विशेष शिक्षक शंकर येलाले उपस्थित होते. यावेळी बिपिन दास यांनी डॉ. हेलन केलर यांच्या कार्याचा गौरव करत मूकबधिर विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचे आणि त्यांच्या प्रगतीचे विशेष कौतुक केले. चित्रकला, हस्तकला आणि अध्ययन यांसारख्या क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. दिवसाचे औचित्य साधून विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय वह्या आणि टी-शर्ट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपात मुख्याध्यापक दत्तात्रय काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदेव गुरमे यांनी केले, तर आभार विशेष शिक्षक गणेश सातपुते यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.




# राज्यस्तरीय कहार समाज वधू–वर परिचय मेळावा ८ डिसेंबर रोजी

**गंगापूर । प्रतिनिधी**

कहार समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी सतत कार्यरत असलेल्या कहार कर्मचारी समाज सेवा ट्रस्ट महाराष्ट्र राज्य आणि समस्त कहार समाज यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा रविवार, ८ डिसेंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील ढींबरगल्ली, बेगमपुरा येथे सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे. या निशुल्क मेळाव्यात समाजातील उपवर वधू–वरांना परिचयाची संधी मिळणार आहे. मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष संतोष पंडुरे, उपाध्यक्ष प्रांजली तुंबारे, सुनील तुंबारे, मनोज बिरुटे, किशोर बिरुटे, अंजलीताई कचरे, मोहिंदर पंडूरे, बाळू लहरे, प्रा. डॉ. दिलीप बिरुटे, अनिल बिरुटे, कृष्णा पल्हारे, कल्याण केथा, सदाशिव पंडूरे, प्रेमचंद गहिरे, चरण कुंठे, राजू बिरुटे, पन्नालाल बिरुटे, आणि विश्वंबर कुंठे यांनी केले आहे. समाजातील सर्व उपवर वधू–वर आणि कहार समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# समाजव्यवस्थेमध्ये राज्यघटनेला संरक्षण राहिले नाही तर येणाऱ्या पिढ्या स्वाभिमानाने जगू शकणार नाहीत–प्रताप ढाकणे

**पाथर्डी । प्रतिनिधी**

आज देशात एक विशिष्ट प्रकारची विचारसरणी कार्यरत असून समाजव्यवस्थेमध्ये राज्यघटनेला संरक्षण राहिले नाही तर येणाऱ्या पिढया स्वाभिमानाने जगू शकणार नाहीत असे प्रतिपादन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव प्रताप ढाकणे यांनी केले.ते आज भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.यावेळी बंडू पाटील बोरुडे,विष्णुपंत पवार,संदीप काटे,मोहनराव गाडे,हुमायुन आतार,योगेश रासने, देवा पवार, सचिन नागपुरे,विशाल उदमले आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी म्हटले की,ज्या महापुरुषांनी एक वैचारिक लढा उभा करून समाजासाठी आपले सर्व आयुष्य पणाला लावले ते विचार आपण अंमलात आणले जात नसल्याने आज समाजात विसंगती आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज हे तुमच्या आमच्या सारखेच सामान्य घरात जन्माला आले होते परंतू त्यांनी विशिष्ट ध्येयाने आणि विचाराने संपूर्ण आयुष्य पणाला लावत समाजाला दिशा दिली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षं मुख्य प्रवाहाच्या बाहेर असलेल्या वंचिताना जोडण्याचे काम करत समाजातील प्रत्येक घटकांचा विचार करून देशाला राज्यघटना दिली म्हणून ते महामानव ठरले.ज्या लोकशाहीच्या माध्यमातून ७८ वर्षांपासून हा देश प्रगतीशील पणाने आपण काम करत होता आणि त्यांचा आत्मा लोकशाही होती.मला असलेला लोकप्रतिनिधी,सरकार मी निवडून देईल हा अधिकार बाबासाहेबानी दिला.परंतु गेल्या १० वर्षांमध्ये लोकशाहीच्या नावाने अभिप्रेत असलेली लोकशाही नांदते का? हा सवाल आज प्रत्येकाच्या मनात आहे.

राज्यघटना सर्वश्रेष्ठ असून या देशाचे धर्म,श्वास आणि भविष्य हे राज्यघटना आहे म्हणून देशाचे भविष्य सुरक्षित ठेवायाचे असेल तर राज्यघटना सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रित येत आपले वैचारिक भेदभाव बाजूला ठेवत राज्यघटना संरक्षणासाठी करावा लागणाऱ्या त्यागाची मानसिकता ठेवणं हेच आपलं ध्येय ठेवून मार्गक्रमण केल्यास तीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली असेल असे शेवटी ढाकणे म्हणाले.सूत्रसंचालन वसंत बोर्डे आणि आभार दिगंबर गाडे यांनी मानले.



# दीड एकर ऊस जळाला डाळिंब बागेचे नुकसान

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

श्रीरामपूर तालुक्यातील भोकर शिवारात उसाची तोड चालू असताना पहाटे थंडीपासून संरक्षण होण्यासाठी ऊसतोड मजुरांनी पेटविलेल्या पाचटाने दुपारनंतर अचानक पेट घेतल्याने दीड एकर ऊस जळाला, तर शेजारील डाळिंब बागाचेही मोठे नुकसान झाल्याची घटना घडली.

भोकर शिवारात गट नंबर १४४ मध्ये कमलबाई दाजीबा शिंदे यांच्या उसाची तोड सुरू आहे. थंडीमुळे पाचट पेटवून आपले ऊस तोडीचे काम पूर्ण करून गाड्या भरून निघून गेले. मात्र, दुपारनंतर पाचटाने अचानक पेट घेतला व वाऱ्याच्या वेगामुळे ही आग शेजारील सागर शिंदे यांच्या उसाला लागली.



क्षणात आगीने रौद्ररुप धारण केल्याने शिंदे यांचा दीड एकर ऊस जळून खाक झाला, तर शेजारीच असलेल्या कारभारी शिंदे यांच्या डाळिंब बागेचेही आगीत नुकसान झाले आहे.

# हवामान खात्याने सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रात अवकाळी पावसाला सुरुवात 'या' जिल्ह्यांमध्ये मुसळधारा,कोण–कोणत्या जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यात मुसळधार पाऊस झाला. तामिळनाडूमधील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पाऊस झाला असून यामुळे सर्वसामान्य जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

कर्नाटकातही अशीच परिस्थिती पाहायला मिळाली असून याचा प्रभाव आपल्या महाराष्ट्रावरही दिसत आहे. भारतीय हवामान खात्याने सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रात अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे.

मध्य महाराष्ट्रातील नाशिक, धुळेसहित अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाने दणका दिला आहे. नाशिक जिल्ह्यातील कळवण सटाणा मालेगाव देवळा अर्थातच कसमादे पट्ट्यातील अनेक गावांमध्ये अवकाळी पावसाने दणका दिला असून यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.दरम्यान भारतीय हवामान खात्याने महाराष्ट्रात आजपासून पुढील तीन दिवस म्हणजेच ७ डिसेंबर पर्यंत पावसाची शक्यता वर्तवली आहे. हवामान खात्याने आज राज्यातील तब्बल दहा जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस पडणार असा अंदाज दिला आहे.

हवामान खात्यातील तज्ञानी सांगितल्याप्रमाणे, अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्यांचा वेग वाढून कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. या संबंधित जिल्ह्यांना भारतीय हवामान खात्याकडून जोरदार पावसाचा येलो अलर्ट देखील देण्यात आला आहे.बंगालच्या उपसागरातल्या फेंगल चक्रीवादळाची तीव्रता कमी झालीये पण त्याचा परिणाम आता शेवटच्या टप्प्यात आपल्या राज्यावर होताना दिसत आहे. या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यातील दक्षिणेकडील जिल्ह्यांमध्ये पावसासाठी पोषक परिस्थिती तयार झाली आहे.

कोकण : हवामान खात्याने आज कोकणातील दक्षिणेकडील रत्नागिरी, रायगड, सिंधूदुर्ग या जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह अन विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. या जिल्ह्यांना यलो अलर्ट सुद्धा जारी करण्यात आला आहे.

मध्य महाराष्ट्र : मध्य महाराष्ट्र विभागातील अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यात आज पाऊस हजेरी लावणारा असा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रातील यासंबंधी जिल्ह्याच्या घाट परिसरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून या जिल्ह्यांना देखील पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

मराठवाडा : मराठवाड्यातील दक्षिणेकडील धाराशिव व लातूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडणार असा अंदाज आहे. तसेच बीड, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो असे आयएमडीने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील या संबंधित जिल्ह्यांना सुद्धा येल्लो अलर्ट देण्यात आला आहे.

# हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी अकील काजी गोळवाडीकर यांची नियुक्ती

**वैजापूर । प्रतिनिधी**

हिंदुस्तान जर्नलिस्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी अकील काजी गोळवाडीकर यांची नियुक्ती घोषित केली. यावेळी आयेशा खान मुलानी यांनी पत्रकारांवरील अन्यायाविरोधात असोसिएशनने नेहमीच आवाज उठवणार असल्याचे सांगितले. तसेच, संघटनेच्या कार्यक्षेत्राचा विस्तार आणि पत्रकारांच्या हक्कांसाठी काम करण्याच्या भूमिका मांडण्यात आल्या.



अकील काजी यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी, कार्याध्यक्षा आयेशा खान मुलानी, प्रदेश महासचिव विनोद भोकरे, प्रदेश सचिव जावेद पठाण, उपाध्यक्ष रणजितसिंह ठाकूर, रियाज शेख, प्रा. संजय तुपे, मिडिया प्रभारी अमजद पठाण, विदर्भ प्रवक्ता सय्यद जावेद यांच्यासह विविध जिल्हाध्यक्ष आणि सदस्यांनी अभिनंदन केले.या निवडीमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पत्रकारांच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# संत गजानन माऊली जिनिंग येथे सीसीआयची खरेदी सुरू



**पुलगाव । प्रतिनिधी**

संत गजानन माऊली जिनिंग अँड प्रेसिंग, आपटी रोड येथे सीसीआयची कापूस खरेदी सुरू झाली आहे. यावेळी शेतकरी राजेंद्र होले यांचा जिनिंगचे मालक अनिल नाहटा व श्याम टावरी यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

खरेदी प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. यावेळी सीसीआय महाकोचे सीनियर ग्रेडर सतीश कडू, सीसीआयचे पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव दीपक नांदे, मापारी अशोक पराळे उपस्थित होते. शेतकऱ्यांसाठी ही खरेदी प्रक्रिया फायदेशीर ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे स्नेहमिलन व सत्कार सोहळा संपन्न




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक राणी लक्ष्मीबाई नगरपालिका शाळा क्र. १ (योग भवन) येथे जि.प., न.प., व खाजगी प्राथमिक शिक्षकांचे स्नेहमिलन व सत्कार सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षणाधिकारी धनराज तेलंग होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे, ॲड. दिनेश शर्मा, सेवानिवृत्त शिक्षक संघटना राज्याध्यक्ष प्रदीप तपासे, गटशिक्षणाधिकारी सतिष आत्राम उपस्थित होते.कार्यक्रमात सेवानिवृत्त १५ मुख्याध्यापक व शिक्षकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश तेलरांधे यांनी केले, संचालन विठ्ठल वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कल्पना बिरे यांनी मानले.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# श्रीराम व रामायणाबद्दल समाज माध्यमांवर अभद्र टिप्पणी; कारवाईची मागणी

**पुलगाव । प्रतिनिधी**

श्रीराम जन्म शोभायात्रा समितीने प्रभू श्रीरामचंद्र व श्रीरामायण यांच्याबद्दल समाज माध्यमांवर अभद्र टिप्पणी करणाऱ्या व्यक्तींविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. समितीचे अध्यक्ष संदीप बद्रीसिंग ठाकूर यांनी पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे यांना निवेदन सादर केले.



निवेदनात म्हटले आहे की, गैरअर्जदार सुभाष बापुराव भगत (रा. विजयश्री कॉलनी, नाचणगाव), विशाल जाटव व किरण खुशाल उपाध्ये (रा. हिवरा हाडके, ता. देवळी) यांनी फेसबुक आणि इंस्टाग्रामवर हिंदू धर्माचे आराध्य देव प्रभू श्रीराम यांना हरामी असे उल्लेखीत केले आहे. तसेच, रामायण ग्रंथाला पाखंडवाद असे संबोधले आहे. या अभद्र पोस्टमुळे हिंदू समाजात संतापाची भावना निर्माण झाली असून धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत.

श्रीराम जन्म शोभायात्रा समितीने या प्रकाराचा निषेध करत संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. निवेदनानुसार, आरोपी समाज माध्यमांवर वारंवार हिंदू धर्म आणि त्यांच्या श्रद्धेचा अपमान करीत आहेत, ज्यामुळे समाजात तणाव निर्माण होऊ शकतो. शोभायात्रा समितीच्या कार्यकर्त्यांनी आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

# नागेबाबा मल्टिस्टेटच्या मयत सभासद यांच्या वारसास नागेबाबा सभासद सुरक्षाकवच योजनेअंतर्गत दहा लाख रूपयेचा धनादेश प्रदान

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

संत नागेबाबा मल्टीस्टेट संस्था वर्षाचे ३६५दिवस ग्राहकांना सेवा देताना केवळ आर्थिक क्षेत्रात कार्य न करता आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या उद्देशाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय कडूभाऊ काळे सर यांच्या मार्गदर्शनातून व संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व सभासदांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करत आहे.


संस्थेतील प्रत्येक सभासद हा आपला परिवारातील घटक आहे. याचा विचार करून आपल्या संस्थेतील सभासदांसाठी नागेबाबा सभासद सुरक्षा कवच योजना चालू केलेली यामध्ये अपघाती मृत्यू झाल्यास सभासदांच्या



वारसांना १० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत करण्यात येते तसेच अपघात झाल्यास ५ लाख रुपयांपर्यंत हॉस्पिटल खर्च देण्यात येतो.

या योजनेतून त्या कुटुंबाचा खरा आधार देण्याचे काम संस्था करत असते. श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट नेवासे शाखेचे खातेदार सभासद कै. सौरभ शरद काळे यांचे मागील काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले. त्यांनी नागेबाबा सुरक्षा कवच योजनेअंतर्गत नाव नोंदणी केलेली होती. आज त्यांच्या वारसास १०,००,०००)/– अक्षरी दहा लाख रुपयेकिमतीचा धनादेश नागेबाबा मल्टीस्टेटच्या वतीने शाखेचे खातेदार व मान्यवरांच्या उपस्थितीत सुपूर्त करण्यात आला. कै. सौरभ काळे यांच्या मागे वडील व दोन बहिणी असे कुटुंब आहे. यावेळी भानसहिवरा ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच किशोर जोजार, ह भ प अविराज महाराज, अशोक शेठ बोरा, बाळासाहेब भनगे, जाधव वकील साहेब, कचरू शेठ भणगे, देविदास साळुंके, कालिका फर्निचरचे अरुण रासने, कोकाटे साहेब, भाऊसाहेब फुलारी, रमेश नळकांडे, बाळासाहेब पेहरे, भाऊसाहेब बनकर, संदीप फुलारी सर, रमेश गुणवंत, बाबासाहेब ढवाण डॉक्टर सोनवणे साहेब, रावसाहेब धेडगे, भाऊसाहेब पंडित व इतर ग्रामस्थ व नागेबाबा परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# बल्लारपूर पब्लिक स्कूल,मूल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा




**मूल । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बल्लारपूर पब्लिक स्कूल, मूल येथे ६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६८ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य विनोद बोलीवार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून विभाग प्रमुख दुर्गा कोटगले उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व अंश तेलसे व कशीश रामटेके यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पांजली अर्पण करून झाली. प्राचार्य विनोद बोलीवार यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर अलुरवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन अस्मिता साहरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ब्रिलियंट स्कूल हिंगणघाटमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी आदरांजली

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था संचालित ब्रिलियंट स्कूल, हिंगणघाट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अभय दांडेकर होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आपल्या शब्दांत सादर केले. अध्यक्षीय भाषणात अभय दांडेकर यांनी बाबासाहेबांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सुनल काळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन शिक्षिका अमिषा लोणकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.



# लाच मागणाऱ्या तलाठ्यावर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

खरेदी खत केलेल्या जमिनीची नोंद सात–बारा उताऱ्यात करून देण्यासाठी दहा हजार रुपयांची मागणी करणाऱ्या लाचखोर तलाठ्यावर लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मुजीब अब्दुलरबशेख (वय ५१) असे आरोपी तलाठ्याचे नाव आहे.

मुजीब शेख याची जामखेड तालुक्यातील हाळगाव येथे नियुक्ती असताना त्याने एका खरेदी खत झालेल्या जमिनीची नोंद लावण्यासाठी ३० मे रोजी १० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. या संदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत पथकाकडे तक्रार केली होती. पंचासमक्षही मुजीब शेखने लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवली होती. या प्रकरणीलाचलुचपत प्रतिबंधक पथकाने गुन्हा दाखल केला आहे.

Anti Corruption Bureau Maharashtra
ACB
ला. प्र. वि.
Our Work is Our Mission

# गाडगेबाबा उद्यानालाही उतरती कळा;श्रीरामपूर नगर परिषदेकडून देखभाल, दुरुस्तीची अपेक्षा

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

:नेहरू उद्यानानंतर शहरातील वॉर्ड क्रमांक एकमध्ये जानेवारी २००८ साली नगरपरिषदेने संत गाडगेबाबा उद्यानाची निर्मिती केली. मात्र, याच्याही देखभाल दुरुस्तीकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे नेहरू उद्यानाप्रमाणेच याही उद्यानाला उतरती कळा लागली आहे.

तत्कालीन नगराध्यक्ष संजय फंड यांच्याकार्यकाळात आमदार (स्व.) जयंत ससाणे यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून जुन्या तहसील कचेरीजवळ संत गाडगेबाबा उद्यानाची निर्मिती करण्यात आली. या उद्यानाचे सिनेअभिनेते सुनील शेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते. नेहरू उद्यानाप्रमाणेच हेही उद्यान शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरले. संगीत कारंजा, छोटेखानी वाढदिवस, कार्यक्रमांसाठी लॉन्स व बैठक व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, योगा व प्राणायामासाठी महिला व पुरुषांना स्वतंत्र व्यवस्था, उद्यानाच्या गोलाकार जॉगिंग ट्रॅक आहे. योगा करण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींसाठीची व्यायामाचे साहित्यही निकामी झाले आहे.

लहान मुलांच्या खेळण्या ज्यात घसरगुंड्या, झोके वापरण्यायोग्य राहिलेले नाहीत. छोट्या कार्यक्रमासाठी असलेल्या जागेतील लॉन नावालाही शिल्लक नाही. येथे बसण्यासाठी केलेल्या ओट्याच्या फरशाही निखळल्या आहेत. कारंजाही बंद अवस्थेत आहे. मध्यंतरी तत्कालीन आमदार लहू कानडे यांच्या निधीतून नवीन झोके बसविण्यात आले आहेत हीच काय ती जमेची बाजू.

जॉगिंग ट्रॅकच्या कडेला असलेल्या फरशा निखळून पडल्या आहेत. त्यामुळे येथे जॉगिंगला येणाऱ्या नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते. यावर लाल माती अंथरून हा ट्रॅक वापरणे योग्य करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. उद्यानात मोठ मोठी झाडे असल्याने स्वच्छ हवा मिळते, तसेच पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र योगा करण्याची सुविधा, जॉगिंग ट्रॅक यामुळे दररोज किमान ४०० ते ५०० नागरिक या उद्यानाचा वापर करतात. याची खासियत



म्हणजे आतल्या बाजूला मातीचा, तर बाहेरील बाजूला पेव्हर ब्लॉकचा जॉगिंग ट्रॅक आहे. मात्र, निगा राखणे व देखभाल दुरुस्ती वेळेवर करणे गरजेचे आहे.
जॉगिंग ट्रॅकच्या कडेला असलेल्या फरशा निखळून पडल्या आहेत. त्यामुळे येथे जॉगिंगला येणाऱ्या नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते. यावर लाल माती अंथरून हा ट्रॅक वापरणे योग्य करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. उद्यानात मोठ मोठी झाडे असल्याने स्वच्छ हवा मिळते, तसेच पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र योगा करण्याची सुविधा, जॉगिंग ट्रॅक यामुळे दररोज किमान ४०० ते ५०० नागरिक या उद्यानाचा वापर करतात. याची खासियत

म्हणजे आतल्या बाजूला मातीचा, तर बाहेरील बाजूला पेव्हर ब्लॉकचा जॉगिंग ट्रॅक आहे. मात्र, निगा राखणे व देखभाल दुरुस्ती वेळेवर करणे गरजेचे आहे.

जॉगिंग ट्रॅकची दुरवस्था झाली असून, बऱ्याच ठिकाणी दगड वरती आल्याने तो वापरण्यायोग्य राहिलेला नाही. येथील फुलझाडे व इतर वृक्षांची वेळेवर कटिंग गरजेची आहे. परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर सकाळी व्यायामासाठी येतात. वारंवार सांगूनही याकडे पालिका दुर्लक्ष करते. तातडीने दुरुस्ती न झाल्यास वेळप्रसंगी आंदोलन हाती घ्यावे लागेल.

संत गाडगेबाबा उद्यानातील खेळण्याची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे जॉगिंग ट्रॅक वापरण्यायोग्य व झाडांची वेळेवर कटिंग केली जावी. जेणेकरून व्यायामाला येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होणार नाही. पालिकेचे मुख्याधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकाऱ्यांना वारंवार सूचना केलेल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन येथील खेळण्याची व जॉगिंग ट्रॅकची पाहणी केलेली आहे.

## काळीज पिळवटून टाकणारी घटना

# टेम्पोची आईला धडक कडेवरच्या लेकराचा मृत्यू

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

मद्यधुंद टेम्पो चालकाने हाताला जोराची धडक दिल्याने आईच्या कडेवर असलेल्या तीन वर्षांच्या लेकराचा रस्त्यावर पडून मृत्यू झाला. हा अपघात मंगळवारी (दि. ३) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास नगर-पुणे रोडवरील केडगाव इंडस्ट्रीयल इस्टेट गेटसमोर झाला.

स्वराज संभाजी महारनवर (वय ३, रा. मोहिनीनगर, केडगाव) असे मृत्यू झालेल्या चिमुकल्याचे नाव आहे. संभाजी रामदास महारनवर (रा. मोहिनीनगर, केडगाव) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.



फिर्यादी रेल्वेस्टेशन येथे हमाली करत असून, त्यांच्या पत्नी केडगाव येथील कंपनीत काम करतात. नेहमीप्रमाणे फिर्यादीची पत्नी आपल्या तीन वर्षाच्या मुलाला घेऊन कंपनीत कामासाठी गेल्या होत्या. सायंकाळी सुटी झाल्याने त्या घरी जाण्यासाठी निघाल्या. रस्ता पार करण्यासाठी त्या नगर-पुणे रोडवरील केडगाव इंडस्ट्रीयल इस्टेट गेटसमोर येऊन थांबल्या. त्यावेळी स्वराज त्यांच्या कडेवर होता. त्याचवेळी पुण्याकडून अहिल्यानगरच्या दिशेने भरधाव वेगाने एक टेम्पो आला. या टेम्पोची फिर्यादीच्या पत्नीला जोराची धडक बसली. या धडकेत त्यांच्या कडेवर असलेला स्वराज रस्त्यावर पडला. त्यात तो गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे पुणे रोडवर एकच गर्दी जमली. नातेवाईकांनी स्वराज यास जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मयताच्या वडिलांनी चौकशी केली, तेव्हा टेम्पोचा चालक दारू पिलेला असल्याचे त्यांना सांगण्यात आले, असे फिर्यादीत म्हटले आहे.

**मद्यधुंद वाहन चालक सुसाट**

मद्यधुंद वाहन चालकाकडून धडक देण्याची ही दुसरी घटना आहे. शहरातील महात्मा फुले चौकात मद्यधुंद वाहन चालकाने दिलेल्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना ताजी असतानाच पुणे रोडवर मद्यधुंद चालकाने धडक दिल्याने तीन वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे हा टेम्पो पुण्याकडून अहिल्यानगरकडे येत होता. केडगाव बायपास चौकात वाहनांची तपासणी करण्यासाठी चोवीस तास पोलिस तैनात असतात. तिथे मद्यधुंद वाहन चालकांचीही तपासणी करण्यात येते. तरीही मद्यधुंद टेम्पो चालक शहरात आला कसा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## तोतया अधिकाऱ्यांना शिताफीने अटक

# ‘अन्न व औषध’चे अधिकारी असल्याची बतावणी

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाचे अधिकारी असल्याचा बनाव करून तोतया पथकाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी आणि श्रीरामपूर तालुक्यातील दूध संकलन केंद्रावर धाड टाकल्या. येथे कारवाई टाळण्यासाठी मोठ्या रकमेची मागणी केली. मात्र हे खरे अधिकारी नसल्याचे बिंग फुटले. यानंतर दोन जणांना दूध संकलन केंद्र चालकांनी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.



अहिल्यानगरच्या श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर, उक्कलगाव, मालुंजे तसेच राहुरी तालुक्यातील काही गावांमध्ये मंगळवारी सकाळी आठ ते नऊ वाजेच्या दरम्यान दूध संकलन केंद्रांवर अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाच्या तोतया पथकाने धाड टाकली. दूध तपासणीसाठी अचानक आलेल्या या पथकाला पाहून केंद्र चालक दूध व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली. या पथकातील तोतया अधिकाऱ्यांनी तपासणी करण्यास सुरवात केली होती. दरम्यान अन्न भेसळ प्रतिबंधक पथकाची राज्यात कारवाई सुरू असल्याचे सांगून दूध संकलन केंद्रावर दुधाचे नुमने तपासणी करावयाची आहे, असे सांगितले गेले. काही दूध संकलन केंद्रांवरून नुमने चाचणीसाठी घेतले. कारवाई न करण्यासाठी दूध केंद्र चालकाकडून पैसे उकळल्याचा प्रकार घडला. मात्र यावेळी काही दूध संकलन केंद्र चालकांना काहीतरी गडबड असल्याचे लक्षात आले. यावेळी त्यांची उलटतपासणी करण्यास सुरवात केल्यानंतर बिंग फुटल्याचे लक्षात येताच पथकाने धूम ठोकली.

याच वेळी उक्कलगाव येथून हे बनावट पथक बेलापूर येथे जात असतानाच गावकऱ्यांनी दोघांना पकडले. यात दत्तात्रय वसंतराव साठे, (रा. नायगाव, ता. श्रीरामपूर) आणि अरुण दादासाहेब खुळे (रा. वळण, ता. राहुरी) या दोघांना अटक केली आहे. मात्र यातील तीन जण पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन



**नागपूर | प्रतिनिधी**

कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटना (नागपूर शाखा) तर्फे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती तैलचित्राला पुष्पहार घालण्यात आले. तसेच, संचालनालय, विस्तार शिक्षण, शेतकरी भवन, तेलंखेडी येथील प्रतिमेस माल्यार्पण करून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमात डॉ. शिरीष उपाध्ये (संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता पशु विज्ञान), डॉ. नितीन कुरकुरे (संचालक संशोधन), डॉ. अनिल भिकाने (संचालक विस्तार शिक्षण), डॉ. सचिन बोन्डे (अधिष्ठाता निम्न शिक्षण), डॉ. मुकुंद आमले (अधिष्ठाता मत्स्य विज्ञान), मोना ठाकूर (कुलसचिव), श्रीमती. मनीषा शेंडे (नियंत्रक वित्त), अरिफ शेख (विद्यापीठ अभियंता), सुनील गावंडे (विद्यापीठ ग्रंथपाल), डॉ. भूषण रामटेके (परीक्षा नियंत्रक), डॉ. अजय गावंडे (उपकुलसचिव आस्थापना), डॉ. जितेंद्र वाघाये (उपकुलसचिव शिक्षण) आणि तांत्रिक अधिकारी तसेच कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. गीतांजली ढुमे, उपाध्यक्ष प्रवीण बागडे, व मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा आदर व्यक्त केला आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा घेत विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना सामाजिक न्याय आणि समानतेच्या मार्गावर चालण्याचे आवाहन करण्यात आले.

# तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यात धार्मिक शिक्षनाची महत्वाची भूमिका-पूर्व अभिनेते आरिफ खान

## फुलसावंगी येथे दारुल उलुम च्या बांधकामाची पायभरणी सपन्न;हजारो च्या संख्येनी समाज बांधवानी लावली हजेरी

**उमरखेड | प्रतिनिधी**

आज समाजातील तरुण वर्ग हा इस्लामी शिकवणी पासून दूर लोटला जात असून मुख्य शिकवण विसरल्याने वेगवेगळ्या नशे च्या आहारी जातांना पाहवयास मिळत आहे.अशा धार्मिक मार्गभ्रष्ट तरुणांना धार्मिक शिक्षनाची मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्वाची भूमिका असून, इस्लामी शिकवणी ही माणसाला माणूस बनविते म्हणून शिक्षणाचा प्रचार प्रसार होणे ही काळाची गरज झाली आहे.असे विचार येथील यशवंत नगर येथे दारुल उलुम उमर फारुख (र.) या इस्लामी धार्मिक शिक्षण संस्थेच्या इमारतीची 'संगे बुनियाद' म्हणजे बांधकामाची सुरुवात करण्यात आली. या निमित्ताने पूर्व अभिनेते आरिफ खान यांचे व्यख्यांनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी वरील विचार मुख्य वक्ते आरिफ खान यांनी व्यक्त केले.





फुलसावंगी परिसर हा तालुक्यातील मुस्लिम बहुल गाव असून येथील मुस्लिम तरुणांना धार्मिक शिक्षण घेण्यासाठी पुसद, हिमायत नगर,उमरखेड, वाई अशा वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागते.शिक्षणासाठीची मुलांची ही पायपीट थांबावी या उद्देशाने फुलसावंगी येथे उमर फारुख रजि.दारुल उलुम या नावाने मुफ्ती उमर ईशाती, हाफिज शेख मुज्जफर, शेख फारुख यांच्या माध्यमातून मदरश्याची मुहूर्त मेढ रोवण्यात आली आहे. 'मदरसा' आणि 'उलुम' हें शब्द अरबी असून मदरसा हे शब्द शैक्षणिक संस्थे साठी वापराला जातो तर उलुम या शब्दाचा अर्थ 'ज्ञान' असा होतो.फुलसावंगी येथील नव्याने सुरु होत असलेल्या येथील यशवंत नगर मध्ये मदरश्या च्या इमारती च्या बांधकामाची सुरुवात बुधवारी करण्यात आली. या निमित्ताने बुधवारी धार्मिक प्रबोधनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण पूर्व सिने अभिनेते आरिफ खान होते. त्यांनी यावेळी त्यांची बॉलिवूड ची सोनेरी जगताला सोडण्याचा प्रसंग विषध करून धार्मिक शिकवणी अंगीकारून त्यावर कडेकोड आचरण करण्याचे आव्हान त्यांनी उपस्थित हजारो च्या जन समुदयाला केले.

# केदारेश्वर साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

श्री केदारेश्वर साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदिपन सोहळा व गळीत हंगामाच्या शुभारंभ उपाध्यक्ष माधव काटे यांच्या प्रमुख उपस्थित आज गुरुवारी करण्यात आले आहे. स्वप्नील दौंड यांच्या शुभहस्ते सपत्नीक विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी बोलताना उपाध्यक्ष काटे म्हणाले सचिन घायाळ यांना २०१९ पूर्वी केदारेश्वर भाडेत्वावर चालविण्यास दिला होता. ऊस तोडणी कामगारासाठी आगावू पेमेंट दिले होते. त्यामध्ये स्वत घायाळ यांच्या वडिलांनी कमिशन लाटल्याने तोडणी कामगार हंगामात वेळेवर आले नाहीत. त्यामुळे गळीत हंगाम अडचणीत सापडला गेला, हे निवडणुकीत भाडोत्री सुपारी घेवून भाषण करणाऱ्या सचिन घायाळ यांनी अगोदर तपासून दुसऱ्यावर बेशुट गंभीर आरोप करावेत असा सल्ला उपाध्यक्ष माधव काटे यांनी दिला आहे. निवडणुकीत ज्यांनी भाडोत्री वक्ते आणले त्यांनाही जनतेनी त्यांची जागा निवडणुकीत दाखवली. साधी अनामत रक्कम टिकवता आली नसल्याचे श्री काटे म्हणाले.

केदारेश्वर कारखाना अडचणीत आणण्यासाठी मोठा प्रयत्न झाला. पण प्रतापराव ढाकणे,अध्यक्ष ऋषिकेश ढाकणे व संचालक मंडळाने अडचणीवर मात करून शेतकऱ्यांचे थकित देणे दिले आहे. चालू हंगामात नोंद केलेल्या संपूर्ण उसाचे गाळप केले जाणार आहे डोळ्यासमोर अनेक मोठे आव्हान उभे असून सर्वांना मोठ्या जिद्दीने व एकत्रितपणे सामोरे जावे लागणार आहे, त्यासाठी सभासद, ऊस उत्पादक, शेतकरी, प्राधान्याने ऊस पुरवठा करावा तसेच कामगार ,वाहतुकदार या सर्वांनी हंगाम यशस्वीतेसाठी सहकार्य करण्याचे अहवान माधव काटे यांनी यावेळी केले. तर मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनीकुमार घोळवे यांनी चालू हंगामाचा आढावा घेतला.

यावेळी कार्यक्रमास जेष्ठ संचालक सुरेशचंद्र होळकर, त्रिंबक चेमटे, शहादेव पातकळ , बापूराव घोडके, नवनाथ केदार, शहाजी जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अश्विनीकुमार घोळवे, प्रभारी कार्यकारी संचालक, रमेश गर्जे, मुख्य अभियंता प्रवीण काळोशे, तीर्थराज घुंगरड, पोपटराव केदार, अभिमन्यू विखे, कामगार संचालक शरद सोनवणे, माऊली दसपुते, यांच्यासह अधिकारी शेतकरी आदी उपस्थित होते.

